# मुंबई विद्यापीठ

क्र.आरईजी/आयसीसी/२०२०-२१/३२

**परिपत्रक :-**

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी आणि मीरा-भाईंदर या क्षेत्रातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था यांना असे कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६ /विशि-३, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ परिपत्रकानुसार महाविद्यालये/संस्था यांनी स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून महाविद्यालये / संस्था सुरू कराव्यात असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने स्थानिक प्रशासना कडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत महाविद्यालये/ संस्था सुरू करता येणार नाहीत असे आदेश प्राप्त झाले होते.

त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी मा. आयुक्त, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी आणि मीरा-भाईंदर या महानगरपालिका यांना पत्रे पाठविण्यात आली, परंतु सदर महानगरपालिकेकडून अजूनपर्यंत कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी या क्षेत्रातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था यांना असे कळविण्यात येते की, स्थानिक प्रशासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत महाविद्यालये/ संस्था सुरू करता येणार नाहीत. तरी सदर महानगरपालिका यांच्याकडून आदेश आल्यानंतर पुढील सूचना देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई ४०० ०३२
१२ फेब्रुवारी, २०२१

प्रति

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी आणि मीरा-भाईंदर या क्षेत्रातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था प्रत माहितीसाठी रवाना

१. मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक, (२) मा. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक, (३) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ स्वीय सहाय्यक,